विविध कृषि पुरस्कार व पीक स्पर्धा
विजेते शेतकऱ्यांचा सत्कार करण्याच्या
योजनेसाठी सन २०१७-१८ मध्ये निधी
वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक :- कृभूपु -२०१७/प्र.क्र.१२८/११-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १७ जानेवारी, २०१८

वाचा :- १) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. कृभूपु-२०१२/प्र.क्र.१३४/११-अे, दि.०६.९.२०१४
२) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. कृभूपु-२०१३/प्र.क्र.१७८/११-अे, दि.०६.९.२०१४
३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ -३, दि.१८.०४.२०१७
४) शासन निर्णय कृषि व पदूम विभाग क्र. कृभूपु-२०१५/प्र.क्र.१२८/ ११- अे , दि.२९.०६.२०१७
५) शासन निर्णय कृषि व पदूम विभाग क्र. कृभूपु-२०१७/प्र.क्र.११०/ ११- अे , दि.०६.०७.२०१७
६) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृमावि/पुरक मागणी/६१७/४१०/२०१७, दि.२८.०९.२०१७

प्रस्तावना :-

राज्यातील कृषि व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी व संस्था यांना दरवर्षी विविध कृषि पुरस्कार देवून त्यांचा गौरव करण्यात येतो. सन २०१४ या वर्षीच्या कृषि पुरस्काराचे वितरणाचा कार्यक्रम दि.११.०७.२०१७ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मंत्रालयासमोर मुंबई येथे पार पडला. सदर कार्यक्रमासाठी रु.८७.५० लाख इतक्या अनुदानाची मागणी कृषि आयुक्तालयाने केली होती. सन २०१७-१८ या वर्षासाठी अर्थसंकल्पीय तरतूद असलेला रु. ५५.०० लाख इतका निधी यापूर्वीच दि.०६.०७.२०१७ च्या शासन निर्णयन्वये वितरीत करण्यात आलेला होता. प्रस्तुत कार्यक्रमाकरीता विभागीय कृषि सहसंचालक, कोकण विभाग, ठाणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून दि. ०६.०७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमासाठी कृषि आयुक्तालयाने उपलब्ध करुन दिलेले रु.५५.०० लाख, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांचेकडून प्राप्त रु.६.०० लाख, तसेच, महाबीजकडून प्राप्त रु.१०.०० लाख, असा एकुण रु. ७१.०० लाख इतका निधी विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे यांना उपलब्ध झाला. सदर, रु.७१.०० लाख रकमेपैकी प्रस्तुत कार्यक्रमाकरीता रु. ६७,४३,८९०/- इतकी रक्कम खर्च झालेली असून रु.३,५६,११० /- इतका निधी शिल्लक आहे.

२. यापूर्वी दापोली येथे दि.२८.०१.२०१४ रोजी झालेल्या सन २०१२ च्या शेतकरी सत्कार समारंभ कार्यक्रमासाठी रु. १०७.२५ लाख इतका खर्च झालेला होता. सदर कार्यक्रमासाठी रु.८७.०० लाख निधी प्राप्त झाला होता. या कार्यक्रमासाठी रु.२०.२५ लाख निधी प्रकल्प संचालक (आत्मा) रत्नागिरी व रायगड यांच्याकडून तात्पुरती सोय म्हणून घेण्यात आलेला होता.सदर निधी त्यांना देणे बाकी असून सदर रकमेबाबत लेखा परीक्षणामध्ये आक्षेप घेण्यात आलेला आहे.

३. दरम्यान कृषि आयुक्तालयाने केलेल्या विनंतीनुसार रु.३२.५० लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी सन २०१७-१८ च्या पावसाळी अधिवेशनात सादर करण्यात आली होती. सदर पुरवणी मागणी मान्य झाली असून सदरचा रु.३२.५० लाख इतका निधी सध्या उपलब्ध आहे. या परिस्थितीत दापोली येथे झालेला खर्च भागविण्यासाठी सन २०१४

च्या पुरस्कार कार्यक्रमामधील शिल्लक रु.३,५६,११० रक्कम वजा जाता उर्वरीत रु.१६,६८,८९०/- इतकी रक्कम पुरवणी मागणीव्दारे प्राप्त रु.३२.५० लाख रकमेतून उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वरील पार्श्वभूमिवर दापोली जि.रत्नागिरी येथे आयोजित कृषि पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी (सन २०१२ चे पुरस्कार) झालेला खर्च भागविण्यासाठी सन २०१४ च्या पुरस्कार कार्यक्रमामधील शिल्लक रु.३,५६,११०/- रक्कम वजा जाता उर्वरीत रु.१६,६८,८९०/- रक्कम पुरवणी मागणीव्दारे प्राप्त रु.३२.५० लाख रकमेतून उपलब्ध करुन देण्यास या आदेशान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रयोजनार्थ विभागीय कृषि सहसंचालक, कोकण विभाग, ठाणे यांना आहरण व संवितरण अधिकारी व संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०११७१७१३३४२९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Rajesh Bajirao Ghadge

Digitally signed by Rajesh Bajirao Ghadge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf72ed51d101be222757ea3b6d64ed5fc5de8f8529121e097e2203b90069afce, cn=Rajesh Bajirao Ghadge
Date: 2018.01.17 17:18:27 +05'30'

(रा. बा. घाडगे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति -

१) प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) विभागीय कृषि सह संचालक, कोकण विभाग, ठाणे
५) महालेखापाल-महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
७) सह सचिव (का.११-अे, का.१७-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८) उप सचिव (फलोत्पादन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ठाणे/ रायगड/ रत्नागिरी
१०) कक्ष अधिकारी (का.२-अे,का.१७-अे, का.१४-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) वित्त विभाग (व्यय-१, अर्थसंकल्प-१३/ विनियम), मंत्रालय, मुंबई-३२
१२) निवड नस्ती (कार्यासन ११-अे).